॥ ॐ ॥

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त

नोव्हेंबर २०२०

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org

## ॥ दीपावलीच्या तेजोमय शुभेच्छा ॥

पुसुनि आसवे हसुनि जरा बघ
अनंत ताऱ्यांची वर झगमग
ये परत, परत ये तुझ्या घरी
अंधार दाटला घोर जरी
हा दीप तमावर मात करी ॥

घावावाचुन नसे देवपण
जळल्यावाचुन प्रकाश कोठुन ?
का सांग निराशा तुझ्या उरी
अंधार दाटला घोर जरी
हा दीप तमावर मात करी ॥

**- कवी मंगेश पाडगांवकर**

## शाखा विभाग

### भगिनी निवेदिता शाखा -

उत्सव नवरात्रीचा - जागर स्त्रीशक्तीचा - कर्तृत्व, धैर्य, आत्मविश्वास, संवेदनशीलता, सहनशीलता, ममत्व, धाडस, उत्साह, नावीन्य, कणखरता, जिद्द अशा अनेक गुणांचे एकत्रित दर्शन म्हणजे स्त्रीशक्ती. आज असे एकही क्षेत्र नाही की जिथे स्त्रियांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली नाही. अशा विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा परिचय मुलींना व्हावा या उद्देशाने 'उत्सव नवरात्रीचा-जागर स्त्रीशक्तीचा' असा उपक्रम घेण्यात आला. यामध्ये मुलींनी रोज एका कर्तृत्ववान महिलेची ओळख करून दिली. पुढील महिलांची ओळख मुलींनी करून दिली.

१) अरुणिमा सिन्हा - गाथा राऊत २) सुधा मूर्ती - वैष्णवी सुतार ३) सावित्रीबाई फुले - गौरी शिंदे ४) लता मंगेशकर - साक्षी नवसे ५) मेरी कोम - चंचल ओबी ६) सिंधुताई सपकाळ - दिव्या रामरुळे ७) किरण बेदी - संध्या रामरुळे ८) कल्पना चावला - सृष्टी यंदे ९) हिमा दास - पूर्वा भागवत १०) पी. व्ही. सिंधू - पूर्वा भागवत.

नवरात्रीमध्ये पहिल्या दिवशी 'स्त्री-पुरुष समानता' या विषयावर श्री. संदीप मोरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. दसऱ्याच्या दिवशी मुलींनी सांगितलेल्या माहितीवर प्रश्नमंजूषा गुगल फॉर्मच्या माध्यमातून घेण्यात आली.

**पत्रलेखन** - 'देवीस पत्र' - आपल्या आयुष्यात देवीसमान असणाऱ्या एका स्त्रीला पत्र लिहायचे होते. मग ती स्त्री आपली आई, मैत्रीण, बहीण असू शकते. विशेष सहभाग - कृपाली कानडे.

**नवरात्र मेजवानी** - यामध्ये मुलींनी आपल्या आई-वडिलांना उपवासाचे पदार्थ बनवून द्यायचे होते आणि सोबतच त्या पदार्थाचे गुणधर्म सांगायचे होते. उपवासाचे पदार्थ का महत्त्वाचे असतात आणि तेच पदार्थ उपवासाला का खाल्ले जातात हे मुलींना यातून समजले. उकडलेले रताळे, साबुदाण्याची खिचडी, वरईचा भात, उपवासाची भाकरी, उपवासाचे डोसे असे पदार्थ मुलींनी बनवले होते आणि या पदार्थांचे गुणधर्मसुद्धा सांगितले.

**पालक कट्टा -**

वक्त्या - सौ. शुभांगीताई तांबट

'जन्म बाईचा, बाईचा, खूप घाईचा। एका आईचा, आईचा, एका ताईचा ।।' - आपली आई आपल्यासाठी काम करते, कष्ट करते आणि आपल्याला मोठी करते म्हणूनच नवरात्रीच्या निमित्ताने तिने स्वतःला वेळ द्यावा यासाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. शाखेतील महिला पालक या व्याख्यानामध्ये सहभागी झाल्या होत्या. शुभांगीताई यांनी पालकांशी संवाद साधला. आपण स्वतःसाठी वेळ काढला पाहिजे, मुलींनी आईला व आईने मुलींना कसं समजून घ्यावं याबद्दल सांगितले. ताईंचे यमगरवाडीतील कामाचे अनुभव पालकांना खूप भावले.

**दि. ५ सप्टेंबर - शिक्षक दिन विशेष कार्यक्रम.**

लताताई पुरंदरे यांची मुलाखत.

शाखेतील वर्धिका सृष्टी आणि संध्या यांनी त्यांची मुलाखत घेतली. ताईंनी त्यांच्या लहानपणीचे कॉलेजमधले काही अनुभव सांगितले. त्या शिक्षण घेत असताना आलेल्या अडचणी त्यांनी कशा प्रकारे सोडवल्या हे सांगितले. या सत्राला मेघना देशपांडे, रजनी म्हसवडे, मंजिरी भगत या शिक्षिकासुद्धा उपस्थित होत्या.

**दि. २० सप्टेंबर - कृतीसत्र.**

शाखेतील सायलीताई गुरव हिने सोपे लिफाफा पाकीट व आकर्षक भेट पाकीटे तयार करायला शिकवली.

दि. २७ सप्टेंबर व्याख्यान, वक्ते - श्री. अरविंद केळकर.

प्रामाणिकपणा, मोठ्यांचा आदर, परिस्थिती पाहून प्रतिक्रिया द्यावी, वेळेचे नियोजन इ. गोष्टी सरांनी गोष्टीतून सांगितल्या. वेळेच्या नियोजनाचे महत्त्व सांगितले.

---

### समर्थ रामकृष्ण शाखा -

दर महिन्याच्या सोमवारी गुगल फॉर्मच्या स्वरूपात इतिहास, भूगोल, सामान्यज्ञान, खेळ या विषयावर प्रश्नोत्तरे घेण्यात आली. पुण्यातील ऐतिहासिक स्थळे, बोधकथा, दिनविशेष इत्यादी गोष्टींची माहिती पालक गटावर पाठवण्यात आली.

२७ सप्टेंबर 'जागतिक पर्यटन दिना'च्या निमित्ताने या आठवड्यात मुलांना पुण्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळाविषयी माहिती देण्यात आली. (शनिवारवाडा, लाल महाल, पर्वती, लोणावळा-खंडाळा, सिंहगड, शिवनेरी किल्ला).

**पालकसभा** - १३ सप्टेंबर रोजी या वर्षातील पहिलीच ऑनलाईन पालकसभा घेण्यात आली. ऑनलाईन शाखा, ऑनलाईन तास, त्यामधील उपस्थिती, इतर स्पर्धा आणि उपक्रम याविषयी माहिती देण्यात आली.

**आयपीएल प्रोजेक्ट** - यामध्ये आयपीएल स्पर्धेची, क्रिकेट व आवडत्या खेळाडुंची थोडक्यात माहिती लिहिणे, वर्तमानपत्राची कात्रणे जमवणे, क्रिकेटचा इतिहास लिहिणे अशा घटकांचा समावेश होता.

## स्वामी विवेकानंद शाखा -

वर्धकांसाठी विशेष 'ज्ञानांकुर' उपक्रम घेण्यात आला. ह्या उपक्रमामध्ये मुलांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली. रक्षाबंधन विशेष, दैनंदिन प्रश्नमंजुषा, चला बोधकथा सांगूया, पेपर आर्ट, गोकुळाष्टमी विशेष, माझे छंद, गणेशोत्सव विशेष असे उपक्रम तसेच महिन्यातून ४ दिवस (दर बुधवारी) मैदान ह्या विषयावर प्रश्नमंजूषा घेण्यात आली. जागतिक स्तरावर होणाऱ्या स्पर्धा, भारतीय खेळाडू, आंतरराष्ट्रीय खेळ, खेळाचे महत्त्व यांचा समावेश होता.

कुतुहल जागवूया - भारत देश, भारतीय नद्या, भारताचा स्वातंत्र्यलढा, विज्ञान आणि तंत्रज्ञान यावर आधारित सामान्यज्ञानाचे प्रश्न गटावर पाठवले. दर शुक्रवारी भारताचा नकाशा काढणे, रोमन अंकांच्या साहाय्याने घड्याळाची प्रतिकृती काढणे, चव ओळखणे असे उपक्रम घेण्यात आले. अक्षर सरिता फौंडेशनकडून मिळालेल्या गोष्टी व गाणी यांच्या ध्वनिफिती पालक गटातून मुलांना पाठवल्या.

शाखेत झालेली व्याख्याने -

१) सुरेश पवार - नेतृत्व

२) अक्षय कदम - तर्कशुद्ध चिंतन (लॉजिकल थिंकिंग)

३) मंदार पोफळे - कामातील संघभावना (टीम वर्क)

४) सचिन सनगरे - माझी वर्धिनी

५) सुरेश पवार - कला म्हणजे काय ?

रोटरी क्लबतर्फे एक वेगळा उपक्रम शाखेत राबवला जातो. हा उपक्रम शाखेतील वर्धक गट चालवतात. यावर्षी गटाचा प्रेसिडेंट म्हणून कृष्णा मॅगेरी (इ. ९ वी) व सेक्रेटरी म्हणून प्रणव मालिगौडिक (इ. ९ वी) ह्यांची निवड करण्यात आली. शाखेमध्ये RYLA ही रोटरी क्लबची वार्षिक प्रश्नमंजूषा स्पर्धा झाली. प्रथम क्रमांक - कृष्णा मॅगेरी, द्वितीय क्रमांक - अथर्व निम्हण, तृतीय क्रमांक - सक्षम दाते. ह्या कार्यक्रमासाठी रोटेरियन प्रकाश अवचट उपस्थित होते.

---

## धर्मवीर शंभूराजे शाखा -

शाखेत झालेली व्याख्याने

| **वक्ते** | **विषय** |
|---|---|
| १) अजय रायकर | लघुपट (शेतकरी) |
| २) अजय रायकर, अभय पोते | युवकांचे अनुभव |
| ३) सुरेश पवार, अजय रायकर | दैनंदिन नियोजन |
| ४) कोमल कुलकर्णी | लॉकडाऊनमध्ये घरचे वातावरण आनंदी कसे ठेवावे ? |
| ५) नकुल पोळेकर सर | वेळेचे महत्त्व व नियोजन |

शाखेतील युवकांनी व्यायाम, वाचन, अभ्यास, शाखा व घरातील कामे यांचे नियोजन या विषयांवर सत्रे घेतली.

---

## स्वामी दयानंद सरस्वती शाखा -

शाखेतील इ. १० वीच्या वर्धकांची बैठक घेऊन त्यांचा सध्याचा दिनक्रम, दैनंदिन नियोजन येणाऱ्या अडचणी, फोनचा वापर या गोष्टींबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर ८ वी, ९ वी, १० वीच्या वर्धकांचे गुगल फॉर्मद्वारे पेपर घेण्यात आले. या महिन्यात २ वेळा ऑनलाईन शाखा झाली. शाखेत कोमल धायरकर ताईंनी वर्धकांशी संवाद साधून त्यांना वर्धिनीची माहिती सांगितली. शुभम दादानी गुरुकुल पद्धती समजावून सांगितली.

---

## स्वामी अखंडानंद शाखा -

यंदाच्या वर्षी कोरोना पार्श्वभूमीवर शाखेने वर्धापनदिन वेगळ्या पद्धतीने म्हणजेच प्रत्यक्ष एकत्र न येता फोनच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्याचे ठरवले. शाखेतील प्रत्येक वर्धक, युवक, पालक आणि शिक्षकांच्या आयुष्यात शाखेचे एक वेगळे आणि महत्त्वाचे स्थान आहे. त्या सर्वांच्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा देण्यासाठी वर्धापन दिनानिमित्त शाखेच्या प्रतिनिधींचे मनोगत, अनुभव कथन आणि आठवणी संकलित करून त्याचा एक सुंदर कार्यक्रम झाला. शाखेचे पहिले शाखा प्रमुख श्री. संजय तांबट सर यांनी शाखेच्या आठवणींना उजाळा देत पूर्वीचा काळ, सध्याचा काळ, बदलत्या काळानुसार शाखेचा होत गेलेला विस्तार वर्धिनीच्या एकूणच विस्तारामध्ये अखंडानंद शाखेचा असलेला सिंहाचा वाटा त्याबद्दल महत्त्वपूर्ण आठवणी सांगितल्या. त्यानंतर वर्धक गटातून रोहन नाकती, अथर्व कराळे आणि प्रथमेश देवकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पालक गटातून यश आणि अजिंक्य मांडेचे पालक सौ. प्रीती मांडे यांनी आपले शाखेसंबंधीचे विचार मांडले. शाखेतील शिक्षकांचे प्रतिनिधी म्हणून धनश्री देशपांडे ताईंनी आपले विचार मांडले. टीच इंडिया अंतर्गत शाखेशी झालेली ओळख,

शाखेत शिकवताना त्यांना आलेले अनुभव, वर्धक आणि युवकांचे मिळालेले सहकार्य याविषयी त्यांनी सांगितले. तसेच शाखेतील काही निवडक युवकांनी त्यांचे विचार मांडले. सुधीर लिपारे सर लुब्रिझील इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नवी मुंबईमध्ये प्रोजेक्ट मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत तर दुष्यंत यादव सर एका हॉस्पिटलमध्ये व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहे, समीर येनपुरे दादाची महाराष्ट्र शासनाच्या महसूल खात्यात तलाठी पदावर नुकतीच नियुक्ती झाली. या सर्वांनी त्यांच्या आयुष्यातील वर्धिनीचे महत्त्व आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

## आमचे युवा आमची ताकद



नमस्कार. मी समीर ऐनापुरे. इयत्ता पाचवीपासून मी 'स्व'-रूपवर्धिनी अखंडानंद शाखेचा वर्धक आहे. २००२ सालापासून मी शाखेत यायला सुरुवात केली. शाखेत होणारे विविध कार्यक्रम, व्याख्याने, दैनंदिन व्यायाम, खेळ, वर्षभरात होणारी शिबिरे, सहली यामुळे माणसाची एक वेगळी जडणघडण होते. माझ्या आयुष्यात शाखेचे महत्त्व सांगायचं झालं तर मी इतरांपेक्षा काहीतरी वेगळा आहे हे मला नेहमी जाणवतं. त्यामध्ये कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी ती पूर्णतः समजून घेण्याची वृत्ती, समोरच्याला समजावण्याची हातोटी आणि आपलं म्हणणं इतरांसमोर योग्य पद्धतीने मांडण्याची कला हे सगळं मला शाखेमुळे मिळालं. याचबरोबर दहावी-बारावीच्या दरम्यान करिअरच्या बाबतीत वर्धिनीकडून नेहमीच मार्गदर्शन मिळाले.

अगदी कठीण परिस्थितीतून जिद्दीने आणि मेहनतीने स्वतःची स्वप्न पूर्ण करणाऱ्या आणि समाजाला उपयोगी पडेल असे काम करणाऱ्या अनेकांची चरित्रे वर्धिनीमुळे आमच्यासमोर आली. या सगळ्याचा परिपाक म्हणून माझी नुकतीच महाराष्ट्र शासनाच्या तलाठी या पदावर निवड झाली. माझ्या या यशात वर्धिनीचा खूप मोलाचा वाटा आहे.

## युवती विभाग

युवती विभागाच्या वतीने नवरात्रोत्सव विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. नवरात्र म्हणजे स्त्री शक्तीचा उत्सव. स्त्रियांमध्ये ममत्व, प्रेम, औदार्य, धैर्य, संवेदनशीलता, सामाजिक जाणीव असे अनेक गुण असतात. या सगळ्या गुणांचे एकत्रित दर्शन ज्यांच्या ठायी दिसते आणि ज्या त्यांनी स्वतः निवडलेल्या क्षेत्रात उंचीवर जाऊन पोहोचल्या आहेत, अशा कर्तृत्वाचा परिचय कार्यकर्त्यांना व्हावा, या उद्देशाने या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.



शनिवार दि. १७ ऑक्टोबर २०२० या दिवशी नर्मदालय शिक्षण संकुलाच्या प्रमुख मा. भारतीताई ठाकूर यांनी मार्गदर्शन केले. 'मध्य प्रदेशातील आदिवासी व आसामच्या दुर्गम भागांमध्ये वंचित मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी सुरू केलेल्या शाळा, नर्मदा परिक्रमेतील अनुभव, नर्मदालयाची स्थापना हा त्यांचा जीवनप्रवास अतिशय प्रेरणादायी होता. उत्तम पगाराची नोकरी सोडून सामाजिक कामाच्या तळमळीने ताईंनी आयुष्य वेचले. भारतीताईंनी वेळप्रसंगी संघर्ष केला पण जिद्दीने काम उभे केले.' नवरात्रीच्या निमित्ताने अशा एका आगळ्यावेगळ्या सामान्यातील असामान्य देवी रूप स्त्रीचे दर्शन घडले.



दुसरे व्याख्यान शनिवार, दि. २४ ऑक्टोबर या दिवशी संपन्न झाले. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या उक्तीला सार्थ ठरवणाऱ्या काही निश्चयी व्यक्ती आपल्याला नेहमी प्रेरणा देत असतात. अशाच प्रकारे शांतपणे पण तितक्याच ठामपणे काम करणाऱ्या निवेदिता शाखेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या संगीता यादव यांची मुलाखत अनेक युवती कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारी ठरली. ही मुलाखत आरतीताई काटकर यांनी घेतली. अनेक गुन्हेगारांना वठणीवर आणताना त्यांनी केलेला संघर्ष, परिस्थितीमुळे वाट चुकलेल्या महिलांना सन्मार्गाला लावताना मिळालेले समाधान, बेरड समाजाचे काम करणारे डॉ. भीमराव गस्ती यांच्या सहवासातील अमूल्य आठवणी हा सर्व जीवनप्रवास ताईंनी मांडला. 'स्व'-रूपवर्धिनीच्या संस्कारांचा प्रशासकीय सेवेत काम करताना झालेला फायदा आणि वर्धिनीशी जोडलेली जिव्हाळ्याची नाळ याविषयी बोलताना सगळेजणच भावूक झाले होते. ताईंचे अनुभव नवीन पिढीसाठी नक्कीच मार्गदर्शक ठरले.

## आनंदाची बातमी

१५० ते २०० जणांमध्ये फक्त ५-६ जणांची निवड. यातून स्वामी योगानंद शाखेचा वर्धक **चिन्मय कुलकर्णी** याची मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अॅण्ड ॲग्रीकल्चर (MCCIA) तर्फे शिष्यवृत्तीसाठी (युथ फेलोशिप) निवड झाली आहे.

---



योगानंद शाखेचा वर्धक **लेफ्टनंट अक्षय गायकवाड** याला कॅप्टन पदासाठी बढती मिळाली. सप्टेंबरमध्ये ट्रेनिंग पूर्ण करून त्याचे पहिले पोस्टिंग लेह लडाख, चीन बॉर्डरवर झाले. कार्यक्षमता आणि कार्यतत्परता ही वरिष्ठांच्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे अवघ्या ११ महिन्यात कॅप्टन हे पद अक्षयने वयाच्या २३ व्या वर्षी प्राप्त केले आहे. सीमेवरती चिनी सेनेच्या समोर उभा असलेला आपल्यातील एक अक्षय ! तुझ्या ह्या बढतीला वर्धिनीच्या परिवाराकडून खूप खूप शुभेच्छा आणि आम्हा सर्वांना तुझा खूप खूप अभिमान आहे.

---

## युवा विभाग - कोरोना स्वयंसेवक मोहिम



**देश हमे देता है सबकुछ, हम भी तो कुछ देना सिखे।**

अशी प्रेरणादायी पद्ये गात मोठे होत जाणारे वर्धिनीचे युवक-युवती. शिबिरातून, शाखेतून संस्काररूपी शिदोरी सोबत घेऊन जगताना, आपली ओंजळ समृद्ध करत असताना वेळ आली होती आपली ओंजळ अर्पण करण्याची, नवीन अनुभव व सेवाभावाने ओंजळ पुन्हा भरून घेण्याची. कै. किशाभाऊंच्या स्वप्नातील सेवेकरी निर्माण होण्याची प्रक्रिया होत असताना किशाभाऊंची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवते आहे. निमित्त होते, गरवारे कोविड केअर सेंटरमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करण्याचे. संपूर्ण देशात लॉकडाऊन असताना गरजू कुटुंबांना धान्यवाटप, तपासणी (स्क्रीनिंग) अशा उपक्रमात आपले कार्यकर्ते सहभागी होतेच. कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांमध्ये जाऊन प्रत्यक्ष त्यांची सेवा करण्यासाठी स्वयंसेवकांची आवश्यकता आहे हे समजल्यावर वर्धिनीत कार्यकर्त्यांची फळी उभी करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. कोरोना उपचार केंद्रामध्ये स्वयंसेवक म्हणून जाऊन आलेल्या श्रुती शिधये हिच्या अनुभव कथनाने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला. अनुभवकथन सुरू असतानाच व्हॉटस्‌ॲपवर संदेश येण्यास सुरुवात झाली की, आम्ही स्वयंसेवक म्हणून जाणार आहोत. पहिल्या गटामध्ये ७ कार्यकर्ते स्वयंसेवक म्हणून गेले. याआधी क्रांतिज्योती सावित्री शाखेची युवती कार्यकर्ती पौर्णिमा कांबळे हिने स्वयंसेवक म्हणून कामाचा श्रीगणेशा केला होताच. पहिल्या गटातील कार्यकर्त्यांनी व्हिडिओद्वारे तेथील कामाचे स्वरूप सर्वांपर्यंत पोहोचवले. फोटो, व्हिडिओ घेत असताना तेथील रुग्ण त्यात येणार नाहीत याची दक्षता घेतली जायची. तिथे तसा नियमच होता. फोटो आणि व्हिडिओच्या माध्यमातून, तेथे स्वयंसेवकांची घेतली जाणारी काळजी, तेथील मैत्रीपूर्ण वातावरण याबाबत इतका परिणामकारक संदेश इतर कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचला की पुढील बॅचमध्ये ९ जण स्वयंसेवक म्हणून गेले. शाखेत असताना आपल्यापेक्षा वयाने लहान वर्धकांसोबत काम करण्याचा अनुभव असणारे सर्व युवा आता आपल्यापेक्षा वयाने मोठे असणाऱ्या आणि कोरोना पॉझिटिव्ह असणाऱ्या रुग्णांबरोबर संवाद साधणार होते. त्यांच्याकडे रुग्ण म्हणून न पाहता, माणूस म्हणून पाहणार होते. कधीही कल्पना केली नसेल अशा अनुभवांचे दालन त्यांच्यासाठी खुले होणार होते.

रुग्ण तिथे आला की, आधीच निराश झालेला असू शकतो. अशा वेळी त्यांची मानसिक अवस्था समजावून घेण्याचे काम वयाने लहान असूनही आपले कार्यकर्ते मोठेपणाच्या भावनेतून करत होते. रुग्णांना आधार, दिलासा देणे, त्यांच्या तक्रारी ऐकून घेणे, त्यावर काही उपाय सुचवणे, तो उपाय सहज शक्य असेल तर अंमलात आणणे हे काम स्वयंसेवक करत होते. रुग्णांनाच नाही तर सोबतच्या कार्यकर्त्यांना चहा, काढा, नाष्टा, भोजन मिळाले की नाही याची काळजी घेत होते. तेथील प्रवेशद्वारापाशी काम करत असलेल्या कार्यकर्त्यांपर्यंत देखील हे सर्व नीट पोहोचते आहे ना ? याचीही काळजी करत होते. कोणा स्वयंसेवकाला काही त्रास होत नाहीयेना ? कोणाला मदतीची आवश्यकता आहे ? हे सर्व अगदी मायेने पहात होते, एकमेकांना सांभाळून घेत होते. कोणत्याही बॅचमध्ये फक्त वर्धिनीचेच कार्यकर्तेअसतील असे नाही तर इतरही अनेक युवक युवती होते. त्या सर्वांबरोबर मैत्री करून घेऊन तीही अशा प्रकारे की जणू काही अनेक वर्षे एकमेकांना

ओळखतो, विविध स्वभाव, सवयी असलेल्या स्वयंसेवकांबरोबर एका गटात काम करणे म्हणजे आपोआपच अनेक कौशल्ये विकसित करून घेण्याची संधी. या संधीचा योग्य असा उपयोग आपल्या विकासासाठी होणार आहे आणि तोही नकळतपणे, सहजतेने.



दररोज घेतल्या जाणाऱ्या बैठकांमधून घेतला जाणारा कामाचा आढावा, त्यातील शक्य असतील तेवढ्या सुधारणा, नवीन उपक्रम यासाठी पुरेपूर संधी होती. संवादिनी उत्तम वाजवू शकणारी आणि कीर्तन करणारी अहिल्या धायगुडे या युवतीला वाद्यासहित गाणे सादर करण्याची संधी मिळाली. आपल्या नादमधुर आवाजात माईकवर सूचना देण्याची संधी ऋतुजा नराल हिला मिळाली. रेडिओलॉजी तंत्रज्ञान शिकणाऱ्या पायलला तेथील डॉक्टरांसमवेत एक्स-रे कसा पाहायचा असतो ? याचे अनुभव मिळाले. पीपीई कीट घालून पाण्याने भरलेले जड जार दुसऱ्या-तिसऱ्या मजल्यावर चढवणे हे काम रात्रीची ड्युटी करणाऱ्या अक्षय, सतीश आणि पुष्करने न कंटाळता आनंदाने पार पाडले.



तेथे स्वयंसेवकांची खूप काळजी घेतली जात होती. दररोज ऑक्सिजनची पातळी, नाडीचे ठोके (पल्स रेट), शरीराचे तापमान मोजले जाते. बैठकीच्या वेळी सर्वांना काढा दिला जातो. दिवसभराचा आढावा घेतल्यानंतर एक खेळ खेळला जातो, ज्यातून समुपदेशन कसे करावे, समूहात सर्वांना सांभाळून काम कसे करावे, संघभावना कशी विकसित करावी, याचे प्रशिक्षण आपोआप होते. संघाचे प्रचारक श्री. सुनीलजी साठे, श्री. युवराजजी, तेथील व्यवस्थापक श्री. दीपकजी हे बैठकीस उपस्थित असत. गरवारे सेंटर जसे सुरू झाले आहे त्या पहिल्या दिवसापासून तेथे स्वयंसेवकांना सूचना देणारी, त्यांच्याकडून योग्य प्रकारे काम करवून घेणारी वीणाताई म्हणजे उत्साहाचा झराच आहे. आपण दिवसातून किती वेळा चिडलो, कोणावर चिडलो, कोणत्या कारणासाठी चिडलो हे सर्व विसरून पुन्हा एकदा जोमाने वीणाताई स्वतः काम करते. वीणाताईवर कोणीही राग धरूच शकत नाही. कारण ती ज्या पद्धतीने सर्वांना आपल्या मायेच्या पंखाखाली घेते तेही सामाजिक अंतराचा नियम पाळून, ते पाहिले की तिच्याबद्दलची आपुलकी आणि आदर शतगुणित होतो. वीणाताईने यापूर्वी मणिपूर येथे शिक्षण क्षेत्रात भरपूर काम केले आहे. तिचे अनुभव कथन हाही बैठकीचा एक भाग असायचा. ज्यामुळे इथेच बसून आपण मनानेच मणिपूरचा दौरा करून येतो. आपली युवती कार्यकर्ता दिव्या दररोज जेवत नाही हे कळल्यापासून वीणाताई दररोज भोजनाच्या वेळेत तिला फोन करून ''जेवलीस का ?'' अशी चौकशी करणारच. आमच्या आधीच्या गटातील सानिया नावाच्या एका मुलीला ताप आला होता. लगेचच तिचा बेड वेगळा ठेवला. तिला जेवण जात नव्हते तर तिच्यासाठी सुक्या मेव्याचा खाऊ दिपकजींनी आणून दिला. निवासी डॉक्टरांचे पथक तिथे आहेच. त्यांच्याबरोबर सर्वांचीच मैत्री चटकन होते. सगळे अगदी मनमिळावू, आपल्या ज्ञानाचा अहंकार नसलेले असल्याने त्यांचा आधार वाटायचा आणि मोकळेपणी त्यांच्याशी गप्पाही व्हायच्या. सतीशला तर त्याच्या अभियांत्रिकी क्षेत्रात नोकरी करणारा दादा तिथे भेटला. त्या दादाने सतीशला आणि अनेकांना करिअरबाबत मार्गदर्शन केले.

एक वेगळेपण असे जाणवले की, जे स्वतः रुग्ण म्हणून तेथे आधी होते त्यातील अनेकजण योग्य कालावधीची विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा येत होते, पण स्वयंसेवक म्हणून. तेथील वास्तव्याचा कालावधी संपल्यानंतर रुग्ण घरी जातात. स्वाभाविकच घराची ओढ असणारच. त्यामुळे चेहऱ्यावर हसू असायचे. एकदा सहज म्हटले की, ''आज चेहरा खुललाय. घरी जाणार याचा आनंद चेहऱ्यावर दिसतोय.'' तर लगेच प्रतिक्रिया आली की, ''येथून खरंतर जावेसेच वाटत नाहीये कारण तुम्ही इतकी छान बडदास्त ठेवता.'' अर्थात हा अनुभव एका महिलेचा होता. माहेरपण अनुभवल्याचे सुख आपण या निमित्ताने देऊ शकलो याचे समाधान आपल्याला मिळणार असतेच.



एकाच कुटुंबातील तीन ते चारजण, महिला आणि पुरुषही तिथे रुग्ण म्हणून यायचे. महिला आणि पुरुषांची व्यवस्था वेगवेगळ्या इमारतींमध्ये केलेली होती. रुग्ण एकदा का इमारतीत आला की डिस्चार्ज घेतानाच बाहेर पडणार. एका कुटुंबातील एका महिलेने प्रश्न केला की, आमच्या यजमानांचे कपडे धुवायला मी घेऊ शकते का. कारण यांना स्वतःचे कपडे धुण्याची सवय नाहीये. मनात विचार आला की, याही परिस्थितीत पुरुषी मानसिकता बदलू शकत नाही?




पीपीई कीट घालून डॉक्टरांसमवेत किंवा त्यांच्याशिवाय रुग्णांच्या जवळ जाण्याची संधी अनेकांना मिळाली. एक अनुभव लक्षात राहण्यासारखा आहे. पायल जिरेसाळ पीपीई कीट घालून, डॉक्टरांबरोबर एका महिला रुग्णापाशी गेली. त्यांना खूप त्रास होत होता. शारीरिक त्रासापेक्षा आपण आपल्या घरच्या माणसांबरोबर नाही आहोत याचाच त्रास जास्त असतो. हे त्या महिला रुग्णापेक्षा वयाने लहान असणाऱ्या पायलने बरोबर ओळखले. त्या महिलेचा हात हातात घेऊन तिचे सांत्वन केले. त्या बाईंना खूप आधार वाटला. त्यांनी तिला भरभरून आशीर्वाद दिले. काही रुग्ण खूप मजेशीर असायचे. मला झोपच येत नाहीये. आता मी काय करू ? असे फोन तर रात्री नित्याचेच. गरवारे सेंटरमधून घरी गेलेल्या व्यक्तीही कधी कधी असे फोन करतात. अशा वेळी त्यांना दिलासा देणे हे कामही करायला लागायचे. एकाच कुटुंबातील आई आणि छोटी मुलगी एका इमारतीत आणि बाबा दुसऱ्या इमारतीत. एकमेकांना लांबून फक्त बघायचे. चहा नाष्ट्याच्या वेळी छोटीला तिचे बाबा दिसणार. अशा वेळी आनंदून गेलेली पण बाबांच्या जवळ जाऊ शकत नसल्याने येणारी अगतिकता असे संमिश्र भाव चेहऱ्यावर असलेली छोटी बघून आपल्या ऋतुजाचेही मन हेलावून गेले. ऋतुजा स्वत: मानसशास्त्र विषयाचे शिक्षण घेत आहे. दररोज संध्याकाळी तेथे रुग्णांचे समुपदेशन होते. ज्या रुग्णांना दुसऱ्या दिवशी डिस्चार्ज मिळणार आहे अशा रुग्णांचे समुपदेशन डॉक्टर कसे करतात हे पाहण्याची संधी ऋतुजाला मिळाली. पाठ्यपुस्तकातील विषयाचे प्रात्यक्षिकच जणू तिला अनुभवण्यास मिळाले.

सगळ्यात मजेशीर गोष्ट होती, रुग्णांच्या घरून येणाऱ्या वस्तूंचे पार्सल त्या त्या रुग्णापर्यंत पोहोचवणे. त्या पार्सलमध्ये नेमके काय आहे ? हे तपासणे जिकीरीचे काम होते. कारण अनेकदा रुग्णाचे पथ्य मोडणारे पदार्थ पार्सलमधून यायचे. कोणाकोणाला काही व्यसन असेल तर त्या व्यसनांपासून दहा ते बारा दिवस दूर राहण्याची सजा रुग्णाला असायची. मग तेही पार्सल माध्यमातून स्वत:चे व्यसन पूर्ण होईल असा प्रयत्न करायचे. पण आपले स्वयंसेवक भारी होते. त्यांना बैठकांमधून सांगितले असायचेच. पार्सल नीट तपासून घेऊन मगच आवश्यक त्या गोष्टी रुग्णापर्यंत पोहोचायच्या. सिगारेट, गुटखा, तेलकट-तळलेल्या वस्तू, विकतचे खाद्यपदार्थ रुग्णांपर्यंत पोहोचायच्या नाहीत. अनेकदा स्वयंसेवकांचे असे मनापासून काम करणे पाहिल्यावर अनेक रुग्ण त्यांच्या नातेवाईकांना सांगून सर्व स्वयंसेवकांसाठी खाऊही मागवायचे.




दोन बॅचमध्ये सलग आपले कार्यकर्ते तिथे स्वयंसेवक म्हणून गेले होते. पहिल्या बॅचमधील सर्वांचे कोरोना रिपोर्ट निगेटिव्ह आले आणि काम करताना स्वत:ची योग्य प्रकारे काळजी घेण्याचे समाधान लाभले. ''जब देश ने दी आवाज तो हम, घर की राहें भूल गये ।'' असे म्हणत दुसऱ्या बॅचमधील सर्वच ९ जणांनी आणखी एक आठवडा काम पुढे चालू ठेवण्याचे ठरवले. सर्वांनी आपापल्या घरच्यांना येथील कामाची माहिती व्यवस्थितपणे समजावून सांगितल्याचा फायदा असा झाला की सगळयांच्याच घरच्यांनी अजून एक आठवडा काम करण्यासाठी परवानगी दिली. त्यात भर पडली नव्या उमेदीच्या ४ जणांची. असे एकूण तेराजण एकत्र तिसऱ्या बॅचमध्ये होते.



सात दिवस तेथे काम केल्यावर, पुढील सात दिवस विलगीकरण होते. मुलांची राहण्याची सोय पौड रस्त्यावरील सरस्वती वसतीगृहात तर मुलींची सोय कर्वे वसतीगृहात असते. तेथेही वेळच्या वेळी चहा-नाष्टा, दोन्ही वेळचे भोजन, Vitals तपासणी असतेच. सुनीलजी, युवराजजी यांच्यासोबत गप्पा हा एक आनंदाचा भाग. हा कालावधी थोडा कंटाळवाणा वाटतो. कारण तेथून बाहेर पडता येत नाही. त्यापेक्षा प्रत्यक्ष काम करू अशीच मानसिकता असते. पण समाजाच्या स्वास्थ्यासाठी असे विलगीकरण आवश्यक आहे हे पटले की कमी त्रास होतो. कोरोना रुग्णांच्या सान्निध्यात राहून आल्यामुळे कदाचित आपण कोरोना पॉझिटिव्ह झालो असलो तर...? म्हणून ही काळजी घ्यायची. आपण तिथे Corona Warriors म्हणून गेलेलो असतो. तिथून बाहेर पडताना Corona Carriers म्हणून बाहेर पडायचे नसते. या संपूर्ण कालावधीत भेटायला येणारे आणि

सोबत खाऊचा साठा आणणारे निलेशदादा, कोमलताई, राहुलदादा, सुमितदादा, चेतनदादा, सुरेशदादा यांचेही प्रोत्साहन मोलाचे आहे. सर्वात कमाल आहे, सुरज उणेचा याची. दररोज संध्याकाळी आपली नोकरी सांभाळून तो गरवारे सेंटरला जातो आणि तिथे काम करतो.

समाजऋण, देणे समाजाचे असे मोठे शब्द न वापरता आपल्या कृतीतून सहजपणे स्वयंसेवक म्हणून काम करणारे आजची युवा पिढी पाहिली की आशादायक चित्र नजरेसमोर येते. येथे येणाऱ्या स्वयंसेवकांना काही मानधन, पेमेंट दिली जाते का ? असाही प्रश्न मला एकांनी विचारला. त्याचे उत्तर नाही म्हणून देताना माझी मान अभिमानाने उंचावली होती. हेच संस्कार पुढील पिढ्यांमध्ये प्रवाहित होवोत हीच मनोकामना.

**सहभागी स्वयंसेवक** - १) मनीषा पाठक २) ऋतुजा नराल ३) अहिल्या धायगुडे ४) पुष्कर सागडे ५) सतीश बिराजदार ६) अक्षय मुळे ७) पायल जिरेसाळ ८) ओम इजंतकर ९) निखिल साबळे १०) शेखर चव्हाण ११) सत्यम तांबडे १२) प्रणव पोळ १३) प्रथमेश राजगुडे १४) हर्षद पेंढार १५) रोहित ठाकूर १६) वैभव दळवी १७) केदार घाडगे १८) प्रणव ढमाले १९) दिव्या कुंभारकर २०) पायल शहा २१) पौर्णिमा कांबळे २२) सुरज उणेचा २३) संदीप.

## महिला विभाग - कार्यवृत्त लेखन - कार्यशाळा

आपण विविध उपक्रम करीत असतो. परंतु आपणापैकी बरेचजण आपल्या उपक्रमाचे शब्दांकन करीत नाहीत किंवा त्याचे शब्दांकन कसे करावे हेच त्यांना माहीत नसते. त्याच्या नोंदी आणि मांडणी करण्यास ते मागे पडतात. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नोंदी करण्याची आणि मांडणी पद्धत माहीत नसते. त्यासाठीच दि. ७ नोव्हेंबर या दिवशी महिला विभागासाठी कार्यवृत्त लेखन कार्यशाळा घेण्यात आली. हा उपक्रम वेगळा नाही. कधीतरी कोणीतरी हा उपक्रम घेतला असेलच पण ह्या उपक्रमातील आनंद वेगळा असतो हे आम्हाला अनुभवायास मिळाले. सौ. मंजूषा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा घेण्यात आली. ह्या कार्यशाळेला शिवणवर्गातील, परिचारिका वर्गातील, बालवाडीच्या शिक्षिका उपस्थित होत्या. कार्यवृत्तासाठी लेखन करताना तो भूतकाळातच लिहायला हवा. सकारात्मक दृष्टिकोन हवा. समाजाविषयीची समरसता आपल्या कार्यवृत्तातून जाणवली पाहिजे. आपले काम लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे. पाहुण्यांचा विशेष परिचय ह्याच्या कायम नोंदी हव्यात. उपक्रम कधी कोठे झाला, पाहुणे कोण होते, हे महत्त्वाचे मुद्दे मांडले गेले पाहिजेत. आपण केलेल्या उपक्रमांचा अहवाल लिहून ठेवला तर भविष्यकाळात आपल्याला पुन्हा उपयोगी पडेल व आपण सातत्याने नवीन उपक्रम करत राहू.

## प्लाझ्मा शिबिर

विविध रुग्णालयात कोविडसाठी भरती असलेल्या रुग्णांसाठी प्लाझ्माची खूप जास्त प्रमाणात मागणी होत आहे. मात्र या मागणीच्या पार्श्वभूमीवर प्लाझ्मा दानासाठी थोडेच लोक समोर येत आहेत. या समस्येवर उत्तर काढण्यासाठी म्हणून आपण दि.२७ सप्टेंबरला सकाळी १० ते २ या वेळेत 'स्व'-रूपवर्धिनी इमारतीमध्ये प्लाझ्मा दाता प्राथमिक तपासणी शिबिर आयोजित केले होते. यातून २५ कोविड बाधित नागरिक प्लाझ्मा दानासाठी तयार झाले.

## 'स्व'-रूपवर्धिनी व समर्थ भारत पुनर्बांधणी योजना

**यशोगाथा - कमल गायकवाड**

मागील ६ महिने हाताला काम नव्हते. घरी आर्थिक स्थिरता नव्हती. कमल ताईंनी समर्थ भारताच्या वतीने होणाऱ्या व्यवसाय मार्गदर्शन व मदतीसाठी अर्ज भरला होता. डोक्यात व्यवसायाचे चक्र फिरत होते. परंतु नेमका कोणता व्यवसाय करायचा हे समजत नव्हते. व्यवसायासाठी जेव्हा बोलण्यास कमलताई आल्या तेव्हा त्यांचा आटा चक्की विकत घेऊन धान्य दळून देण्याचा विचार पक्का झाला. समर्थ भारत योजनेअंतर्गत कमलताईंना ५०,००० रुपयांचे कर्ज मिळाले. ताईंनी संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यांच्या दळण गिरणीच्या दुकानाचे दि. २० सप्टेंबरला उद्घाटन झाले.

# उत्थान विभाग

## वस्ती विकास प्रकल्प -

मुलाखती - साप्ताहिक अभ्यासिकेत शिक्षक दिनाच्या निमित्ताने मुलांनी वस्ती विभागाचे कार्यकर्ते, रोहिणीताई, उमेशदादा, हनुमान दादा यांच्या मुलाखती घेतल्या.

संवाद सत्र - गणेश मूर्ती विसर्जन अभियानात विभागातील कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यांचे अनुभव ऐकण्यासाठी कोमल कुलकर्णी यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

मानसिक विकास बैठक - या उद्देशाने विभागाची पहिली बैठक मा. बागेश्रीताई पोंक्षे यांनी घेतली. त्यांनी त्यांचे कामातील अनुभव व भेटलेली चांगली माणसे आणि त्यांचा प्रेरणादायी जीवन प्रवास कार्यकर्त्यांपुढे मांडला.

दुसरी बैठक वर्धिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या मा. पुष्पाताई नडे यांनी घेतले. त्यात परिस्थितीनुसार मनावर ताबा कसा ठेवावा?, मन विचलित होऊ नये यासाठी काय करावे?, अनेक गोष्टी समोर असल्यावर त्यातली नेमकी कोणती गोष्ट निवडावी इ. विषयावर पुष्पाताईंनी अभ्यासिका प्रमुखांशी चर्चा केली.

'स्व'-रूपवर्धिनी व समर्थ भारत पुर्नबांधणी योजना आयोजित आरोग्य शिबिर - कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरिता सर्व वस्तीतील नागरिकांची आरोग्य तपासणी करणे आवश्यक आहे असे जाणवले. यासाठी एकूण ८ ठिकाणी आरोग्य शिबिरं घेण्यात आली.

| वस्ती | लाभार्थी नागरिक | वस्ती | लाभार्थी नागरिक |
|---|---|---|---|
| (१) कुंभारवाडा वस्ती - कुंभारवाडा | १३९ | (२) राजीव गांधी सोसायटी - काशेवाडी | १६६ |
| (३) बेलदार वस्ती : बेलदार गल्ली | १५१ | (४) रामायण मित्र मंडळ - न्यू भीमनगर | १४४ |
| (५) राजेवाडी | ९३ | (६) दूधभट्टी, गुरुवार पेठ | ९४ |
| (७) बाजीराव रोड, मंडई | ५७. | (८) काशी विश्वनाथ महादेव मंदिर, काशेवाडी | १६६ |

**शिबिरांचा तपशील -**

१) नागरिक तपासणी संख्या - ११७६
२) पुढील तपासणीकरिता संभाव्य रुग्णसंख्या - १४
३) सहभागी स्वयंसेवक - २१
४) सहभागी डॉक्टर - १३
५) सहभागी सेवा/सहयोगी संस्था - २
६) प्रतिबंधात्मक औषधे वाटप संख्या - १५०
७) आयुर्वेदिक काढा - ५७५ (लाभार्थी)
८) होमिओपॅथिक औषधी - ११७६ (लाभार्थी)

या आरोग्य शिबिरांमध्ये धनश्री शिंदे, पूर्वा भिडे, पायल शहा, वैभव भोसले, अनिल काळे, पूर्वा निनाल, कृष्णा गजरमल, रसिका लोंढे, रितु कांबळे, सोनाली यादव, सोनल काळे, मृणाल सुतार या कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष कामात मोलाचे सहकार्य केले.


काशेवाडी काशीविश्वनाथ शिबीर



बेलदार वस्ती आरोग्य शिबीर


रामायण मित्र मंडळ आरोग्य शिबीर


काशेवाडी राजीव गांधी सोसायटी आरोग्य शिबीर


कुंभारवाडा आरोग्य शिबीर

## समुपदेशन विभाग



प्रेरणा सत्र, वक्ते - श्री. अरविंद केळकर, विषय - संवाद व संपर्क कौशल्य (Communication Skills & Interpersonal Skills) सरांनी वरील विषयाची मांडणी केली. प्रभावीपणे संवाद साधणे हे कदाचित जीवनातील सर्वात महत्त्वाचे कौशल्य आहे. संवाद म्हणजे माहिती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हस्तांतरित करणे ही माहिती आवाजाच्या माध्यमातून, मुद्रित माध्यमे, डिजिटल माध्यमे, दृकश्राव्य माध्यमे तसेच हावभाव, हातवारे यांतून पोहोचवली जाते. संघटनात्मक कामात यशस्वी होण्यासाठी संवाद कौशल्याची सात प्रकारच्या परस्पर कौशल्याची आवश्यकता आहे - तोंडी संवाद, शाब्दिक संप्रेषण, ऐकण्याची कौशल्ये, वाटाघाटी, समस्या सोडवणे, निर्णय घेणे, ठामपणा.



दि. ९ नोव्हेंबर २०२० रोजी लताताई टिळेकर (पुरंदर) यांनी ऑनलाईन परीक्षा एक संधी हा विषय मांडला. यामध्ये त्यांनी आलेल्या परिस्थितीकडे संधी म्हणून पाहिले तर आपण नक्कीच चांगले गुण मिळवू शकतो असे सांगितले. परीक्षा म्हणजे मूल्यांकन आणि स्वतःला किती येत आहे. स्वतःच्या संकल्पना स्पष्ट आहेत की नाही हे मोजण्याचे साधन आहे. त्यामुळे ऑनलाईन परीक्षा असली तरीही मनापासून अभ्यास केला पाहिजे आणि ऑनलाईन माध्यमातून मुलांचे मूल्यमापन व्यवस्थित होऊ शकते असेही त्यांनी सांगितले. शिक्षणाची गंगा स्वतःहूनच आपल्या दारात आली आहे. ही आपल्यासाठी एक चांगली संधी आहे. संधीचं सोनं केलं पाहिजे असं आवर्जून सांगितलं.

## विज्ञान व तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा

### ध्वनी प्रश्नमंजूषा स्पर्धा -



विज्ञान तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा विभागाच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय ध्वनी वर्षाच्या' अनुषंगाने ध्वनी प्रश्नमंजूषा या स्पर्धेचे आयोजन उन्हाळी सुट्टीत करण्यात आले होते. लॉक डाऊन मुळे प्रश्नावली सर्वच शाळांमध्ये पाठवणे शक्य झाले नाही. पर्यायी पोस्टाने काही शाळात तर काही शाळांमध्ये व्हॉटस्‌अप द्वारे प्रश्नावली पाठवण्यात आल्या. पुणे जिल्ह्यातील भोर, मुळशी, हवेली, खेड, पुणे शहर त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्यातील खंडाळा, पाटण येथून एकूण ६४० विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रा. विनायक शुक्ल (सल्लामार्गदर्शक-विज्ञान तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा) यांनी प्रश्नावली तयार करणे तसेच आदर्श उत्तरपत्रिका निश्चित करणे यासाठी मार्गदर्शन केले. परीक्षक म्हणून कार्यक्रम कुमारी ऋतुजा जगदाळे तसेच सौ. मेखला निखळ यांनी काम पाहिले.

रविराज पाटील यांनी स्पर्धेचा निकाल ऑनलाईन कार्यक्रमात जाहीर केला.

**प्रथम क्रमांक** - पायल मच्छिंद्र लाहोट - खेड, विराज संतोष गावडे - पिरंगुट, मानसी उमेश पाटोळे - आंबोली, साक्षी सुनील डावरे - कुरकुंडी.

**द्वितीय क्रमांक** - सोनल कैलास सुतार - आंबोली, सायली नामदेव भोकस - कुरकुंडी, अनिकेत नितीन कांबळे - आंबोली, समृद्धी रमेश भोकस - कुरकुंडी, गौरव नितीन कांबळे - आंबोली.

**तृतीय क्रमांक** - मेधा श्रीपती सुतार-आंबोली, सुहानी दत्ता गिरटकर-खडकवाडी, ओंकार संतोष गायवाड-शिंदेवाडी, निहारिका शांतीलाल पुरोहित-कापूरहोळ, द्वारका सुर्यकांत राचवीर-सोळू.

श्री विश्वास कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले व सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे व प्रश्नमंजूषेची आदर्श उत्तरपत्रिका पोस्टाने शाळेत पाठवली जाईल असे जाहीर केले.

### 'जाणूया कोरोनाला- जाणुया विषाणुला - दूर ठेऊ आजारांना !'

विज्ञान व तंत्रज्ञान - फिरती प्रयोगशाळा - दिनांक २१ जुलै ते १९ ऑगस्ट २०२० या कालावधीत व्हॉटस्‌अपच्या माध्यमातून वरील विषयावर आधारित दररोज एक प्रश्न शाळा शिक्षक गटावर पाठवला जात होता. स्पर्धेचे स्वरूप आणि प्रश्न निश्चित करण्यासाठी डॉ. राजेंद्र देवपुरकर, निवृत्त विभाग प्रमुख (सुक्ष्मजीवशास्त्र, पुणे विद्यापीठ) यांचे मार्गदर्शन लाभले. या

स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील भोर, मुळशी, हवेली, खेड, पुणे शहर त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्यातील खंडाळा, पाटण यासोबतच ठाणे जिल्ह्यातील कल्याण, सांगली जिल्ह्यातील वाळवा येथून एकूण ११५४ विद्यार्थी सहभागी झाले होते. परीक्षक म्हणून कार्यक्रम कुमारी ऋतुजा जगदाळे तसेच सौ. मेखला निखळ यांनी काम पाहिले.

या उपक्रमामुळे करोना आजाराची भीती कमी झाली. तसेच खबरदारी बाळगण्याचे महत्त्व समजले. प्रश्नमंजूषा स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ दिनांक १० ऑक्टोबर २०२० रोजी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. विद्यासागर यांनी मुलांना संशोधक वृत्ती जोपासण्यासाठी विज्ञान शिकणे आणि माहिती शोधणे गरजेचे आहे असे सांगितले. अशा स्पर्धेमुळे कल्पना सुचणे, निरिक्षण करणे, माहितीद्वारे अनुमान काढणे, विश्लेषण करणे, सहजतेने शिकायला मिळते. विज्ञानात आवडीच्या विषयाबरोबर इतर विद्या शाखांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. तसेच चौकस आणि चिकीत्सक वृत्ती असणे आवश्यक आहे. हे वेगवेगळ्या शास्त्रज्ञांच्या उदाहरणांद्वारे समजून सांगितले. भारतीय शास्त्रज्ञांची जगभरात ख्याती आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होऊन भारताला जगभरात अव्वल स्थानी घेऊन जाण्याची संधी विद्यार्थ्यांसमोर आहे हे विषद केले. या उपक्रमावर आधारित पुस्तिका प्रकाशित करावी अशी सुचना त्यांनी केली. स्पर्धेच्या परीक्षिका सौ. मेखला निखळ मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, 'ऑनलाईन पद्धतीने मिळालेली उत्तरपत्रिका तपासणे या प्रकारच्या कामाचा अनुभव नसल्याने हे काम आव्हानात्मक होते. वरद पोतदार या दिघीच्या इयत्ता पाचवीमधील विद्यार्थ्याने केलेले प्रयत्न कौतुकास्पद होते.'

सौ. उमा शिरगुरकर, सह शिक्षिका, कॅ, र. आ. ओक हायस्कूल, कल्याण या स्पर्धेबद्दल अभिप्राय देताना लिहितात, 'आपल्या सर्वांना माहीतच आहे COVID - 19 या विषाणुने सर्व जगभर थैमान घातलं आहे आणि आपल्या संपूर्ण जीवनावर त्याचा परिणाम झाला आहे. असे असताना काळाची गरज लक्षात घेऊन 'स्व'-रूपवर्धिनीने ही आगळीवेगळी विषाणू प्रश्नमंजूषा स्पर्धा मुलांसाठी घेतली. या स्पर्धेतून एकूण ३० प्रश्न विचारले गेले पण रोज फक्त एकच प्रश्न मुलांना पाठवला जाई त्यामुळे सर्व प्रश्नांचा सखोल अभ्यास करणे मुलांना शक्य झाले. मुलांनी आणि आम्ही निरनिराळ्या माध्यमांचा वापर करून प्रश्नांची उत्तरे लिहिली शोधली. 'स्व' रूपवर्धिनीने या काळात राबवलेला उपक्रम अतिशय स्तुत्य असून कार्यकर्त्यांची विद्यार्थ्यांसाठीची तळमळ यातून दिसून येते. त्याबद्दल मी सर्व आयोजकांचे आभार मानते.'

मानसी उमेश पाटोळे, भैरवनाथ विद्यालय, दोंदे येथील विद्यार्थिनीचे मनोगत - 'मी 'स्व'-रूपवर्धिनी द्वारे आयोजित केलेल्या ध्वनी व विषाणू या दोन्ही स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. मी ध्वनी प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी सहावी ते दहावी पर्यंतच्या विज्ञानाच्या पुस्तकातले ध्वनी बद्दलचे धडे वाचले. त्यात मला भरपूर माहिती मिळाली. प्रश्नपत्रिका सोडविताना मला मोबाईलची समस्या निर्माण व्हायची म्हणून मी पुस्तकांचा वापर केला. मी उत्तरपत्रिका पोस्टाने पाठवली त्यामुळे मला पोस्ट ऑफिसमधल्या गोष्टी शिकायला मिळाल्या.'

## स्पर्धा परीक्षा केंद्र



**पालावरची शाळा -**

कोरोनामुळे पुणे सोडून घरी धुळ्यात आलो. काही दिवसांनी म्हटलं गावी आजोळी यावं म्हणून गाव गाठलं. कोविड-१९ मुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. याची सर्वाधिक झळ ''भटक्या विमुक्त'' जातींना बसत होती. आजपर्यंत जी ''सरकारी'' झळ आमच्या वाडवडिलांना बसत होती ती आत्ता आमच्या मुलाबाळांना बसत होती. बंजारा तांड्यात ज्या मुलाची आई १०० रुपये रोजंदारीवर दुसऱ्याच्या शेतात कामाला जाते व ज्यांच्या पिढ्यान्पिढ्या ''ऊसतोडणी'' कामगार म्हणून खपल्या अशा मुलांकडे ''स्मार्टफोन येणार तरी कुठून ?'' सरकारने आणलेल्या ऑनलाईन शिक्षणापासून गरीब विद्यार्थी वंचित रहात होते, त्यामुळे हे ऑनलाईन शिक्षण गरीब विद्यार्थ्यांना शापच ठरत होते. अशा परिस्थितीत तांड्यावरील विद्यार्थ्यांची नाळ ''शिक्षणापासून'' तुटत होती हे पाहून मन व्यथित झाले. म्हणून मित्रांची बैठक घेतली. नंतर मुख्याध्यापकांना जाऊन भेटलो. त्यांना कळकळीने विषय समजून सांगितले. त्यांनीही केंद्र प्रमुखांसोबत बोलणी केली व हताशपणे म्हणाले की या संदर्भात आम्ही तहसील कार्यालय गाठून त्यांना निवेदन सादर केले. काही दिवस वाट पाहिली नंतर स्मरणपत्र सादर केलं पण काहीही होत नव्हतं. शेवटी माझी 'स्व'-रूपवर्धिनी डोळ्यासमोर प्रेरणा म्हणून उभी होतीच. कै. किशाभाऊंचे प्रयत्न ऐकून होतो. त्याची प्रेरणा घेऊन मी विद्यार्थ्यांना जाऊन भेटलो. मुलांशी गप्पा मारणं, त्यांना जाऊन भेटणं, खेळ शिकवणं हे सगळं सुरू केलं आणि मुलं रमायला लागली आणि रोज संध्याकाळी अभ्यासाला जमत होती.



- प्रवीण राठोड

## भावपूर्ण श्रद्धांजली

* शंभूराजे शाखेतील वर्धक अथर्व गादगे याची आई स्वाती मनोज गादगे यांचे दुःखद निधन झाले.

* शंभूराजे शाखेतील वर्धक रोहित साळेकर याचे वडील संजय बाबाजी साळेकर यांचे कोरोनामुळे दुःखद निधन झाले.

* स्वामी अभेदानंद शाखेचा युवक कार्यकर्ता व वर्धिनीच्या कार्यालयातील कार्यकर्ता निशिकांत भालेकर याच्या आईचे श्रीमती मंगला भालेकर यांचे दुःखद निधन झाले.

* समर्थ रामकृष्ण शाखेचा युवक कार्यकर्ता विजय कुर्ले व भगिनी निवेदिता शाखेची युवती लक्ष्मी कुर्ले हिच्या आजीचे वृद्धापकाळाने निधन झाले.

* वर्धिनीचे हितचिंतक व देणगीदार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, जनकल्याण समिती पर्वती भागाचे अध्यक्ष, योगी अरविंद मंचाचे कोशागार श्री. शेखर आफळे यांचे हृदयविकाराने निधन झाले.

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.**

**वर्धिनीचा परिवार त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे**

